**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः23.01.2025** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1) दावोस इथं जागतिक आर्थिक मंचाच्या गुंतवणूक परिषदेत आतापर्यंत राज्यामध्ये 15 लाख 70 हजार कोटी रुपये गुंतवणुकीचे 54 सामंजस्य करार

2) बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेच्या दशकपूर्तीनिमित्त राज्यात विशेष मोहिमेला सुरुवात

3) राज्यात आजपासून वर्षभर हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर एस टी बसस्थानक अभियान

4) जळगाव रेल्वे अपघातात बारा जण ठार झाल्याची पुष्टि

आणि

5) 20 षटकांच्या क्रिकेट मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा इंग्लंडवर सात गडी राखून विजय

**मुख्यमंत्री**

दावोसमधील विश्व आर्थिक मंचाच्या परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रानं काल दुसऱ्या दिवशीपर्यंत 15 लाख 70 हजार कोटी रुपये गुंतवणुकीच्या 54 सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली आहे. यातून अंदाजे सोळा लाख रोजगार निर्मिती होण्याची अपेक्षा आहे अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

सर्वांत मोठ्या गुंतवणुकीचा करार रिलायन्स समूहाचा असून, पेट्रोरसायनं पॉलिएस्टर, नवीकरणीय ऊर्जा, जैवऊर्जा, हरित हायड्रोजन, हरित रसायनं, औद्योगिक क्षेत्रविकास, किरकोळ विक्री, डाटा केंद्रं, दूरसंचार, आदरातिथ्य आणि स्थावर मालमत्ता क्षेत्रात हा समूह 3 लाख 5,000 कोटी रुपये गुंतवणूक करणार

आहे. या एका करारातून 3 लाख रोजगारनिर्मितीचा अंदाज आहे. रिलायन्स समूहासोबत 3 लाख 5 हजार कोटींचा सामंजस्य करार करण्यात आला असून यातील बहुसंख्य गुंतवणूक ही सेवा क्षेत्रात होणार असल्याने सुमारे 3 लाख रोजगार निर्मिती यातून होईल, असं फडणवीस म्हणाले. त्यांनी ब्रिटनचे माजी पंतप्रधान टोनी ब्लेअर यांची भेट घेतली आणि ऊर्जा तसंच सार्वजनिक वाहतूक क्षेत्रासंदर्भात चर्चा केली.

**अभियान**

मुलींची सुरक्षितता, शिक्षण आणि सक्षमीकरणासाठी केंद्र-पुरस्कृत बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेला काल दहा वर्षं पूर्ण झाली. त्यानिमित्त येत्या महिला दिनापर्यंत म्हणजे 8 मार्चपर्यंत दशकपूर्ती अभियान राबवण्यात येणार आहे. राज्यात काल  ठिकठिकाणी  या अभियानाचा प्रांरभ करणारे कार्यक्रम झाले. नाशिक महानगरपालिकेत आयोजित कार्यक्रमात महापालिका आयुक्त मनीषा खत्री आणि जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी सर्व कर्मचाऱ्यांना शपथ दिली. अभियानात मुलींचे संरक्षण,  शिक्षणाला प्रोत्साहन, लिंगभेद निर्मुलन यासाठी जनजागृतीपर उपाय करण्यात येणार असल्याची माहिती अतिरीक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी यावेळी दिली.

धुळ्यात जनजागृती फेरी आणि स्वाक्षरी मोहिमेनं अभियानाला सुरुवात झाली. परभणी, गडचिरोली इथंही कार्यक्रम झाले.

**स्थानक**

दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुढील वर्षभर एसटीच्या राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान  राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ  आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते कुर्ला नेहरूनगर बस स्थानकावर  इथ होणार आहे. या अभियानाच्या अंतर्गत तीन कोटी रुपयांची बक्षिसं  वाटण्यात येणार असून राज्यात 'अ ' वर्गात प्रथम येणाऱ्या बसस्थानकाला १ कोटी रुपयांचं बक्षीस

जाहीर करण्यात येईल अशी घोषणा सरनाईक यांनी केली. यानिमित्तानं सर्व राज्यभर प्रत्येक बसस्थानकावर शालेय विद्यार्थी, सामाजिक संस्था आणि एसटी कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे.

**उपमुख्यमंत्री**

रुग्णसेवेचं अखंड व्रत घेतलेलं केईएम रुग्णालय हे मुंबईकरांचं खऱ्या अर्थानं आधारवड आहे. विश्वासानं रुग्ण इथं येतात त्यांना जागा कमी पडू नये यासाठी केईएममध्ये आयुष्मान शताब्दी मनोरा उभारावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि केईएम रुग्णालयाच्या शताब्दी सोहोळ्यात ते काल बोलत होते.
केईएम हे देशातील सर्वोत्तम रुग्णालयापैकी एक आहे. हे रुग्णालय सर्वसमान्यांसाठी देवदूतासारखे आहे. इथल्या डॉक्टरांचे, नर्सेसचे, कर्मचाऱ्यांचे आभार मानावे तेवढे कमी आहेत. लाखो रुग्णांना जीवनदान देणाऱ्या केईएम रुग्णालयाच्या चरणी नतमस्तक झाल्याची भावना शिंदे यांनी यावेळी व्यक्त केली.

**परदेशी पक्षी**

पालघर जिल्ह्यामध्ये चांगलीच थंडी पडू लागली असून पाणथळ भागांमध्ये देशीविदेशी पक्षांचे थवे दिसून येत आहेत. याविषयी आमच्या प्रतिनिधीचा हा वृत्तांत...

**पालघर जिल्ह्यातल्या खाडी भागांमध्ये सध्या स्थानिक स्थलांतरित पक्षी स्पॉटबिल्ड डक म्हणजेच हळदीकुंकू बदकाचे थवे दिसून येत आहेत. या बदकांच्या पंखाच्या बाजूने पांढऱ्या, तपकिरी आणि हिरव्या रंगाचे पट्टे असतात. तसचं त्यांचे पाय नारंगी तांबड्या रंगाचे असतात. यांच्या चोची वर लाल आणि पिवळे रंग दिसत असल्याने या बदकांना स्थानिक भाषेमध्ये हळदीकुंकू बदक असंही म्हणतात. इतर बदकांच्या आकारापेक्षा ही बदकं मोठ्या आकाराची असतात. जुलै ते सप्टेंबर हा या पक्षांचा विणीचा हंगाम असतो. नदी, सरोवर, तलाव, खारफुटीची ठिकाणं यासारख्या पाणथळ**

**भागांमध्ये सध्या या बदकांचे थवे दिसून येत असल्यानं पक्षीमित्रांना पक्षी निरीक्षणाची चांगलीच पर्वणी लाभली आहे. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी, नीतू चौरे, पालघर.**

**हस्ताक्षर दिन**

23 जानेवारी हा जागतिक **हस्ताक्षर दिन** म्हणून साजरा केला जातो. डिजिटल युगात हातानं लिखाण करण्याची सवय कालबाह्य होऊ लागली आहे. मात्र सुवाच्य हस्ताक्षराचा आग्रह धरत पुण्यासह विविध जिल्ह्यांमध्ये शिबिर, मार्गदर्शनपर वर्ग घेत हस्ताक्षर तज्ज्ञ किशोर कुलकर्णी 25 वर्षांहून अधिक काळ झटत आहेत. भूगू पत्रांपासून ते कागदावरील लिखाणापर्यंतची हस्ताक्षरातील स्थित्यंतरे दर्शवणारी प्रदर्शनंही ते राज्यभरात भरवत असतात. आजच्या जागतिक हस्ताक्षर दिनानिमित्त आकाशवाणीशी संवाद साधतांना **किशोर कुलकर्णी** म्हणाले...

**राज्यपाल**

भारतीय टपाल विभागानं आपल्या दीडशे वर्षांहून अधिक काळाच्या वाटचालीमध्ये मानवी संवेदनेसह सेवा देऊन लोकांसोबत भावनिक नातं जोपासलं आहे. हे भावनिक नाते आणि विश्वासाची परंपरा हे डाक विभागाचे बलस्थान असून, आगामी काळात डाक विभाग विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देईल, असा विश्वास राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केला.

भारतीय डाक विभागाच्या महाराष्ट्र परिमंडळातर्फे आयोजित राज्यस्तरीय डाक तिकीट प्रदर्शनाच उद्घाटन काल राज्यपालांच्या हस्ते मुंबईतल्या जागतिक व्यापार केंद्रात झालं, त्यावेळी ते बोलत होते. विद्यार्थी आणि युवकांना पत्रलेखन, तिकीट संकलन आदी विषयांची गोडी लावण्याचा डाक विभागाचा उपक्रम स्तुत्य असल्याचं ते म्हणाले.

**मदत**
वर्धा जिल्ह्यातील आर्वी उपविभागात गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये आणि अमरावती, अकोला आणि बुलढाणा जिल्ह्यात जुलै ते ऑगस्ट या कालावधीत ढगाळ वातावरण तसंच सततच्या पावसामुळं संत्रागळतीमुळं शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं होतं. त्यासाठी विशेष बाब म्हणून 165 कोटी रुपयांहून अधिक मदत देणार असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली.

**पुरस्कार**
लोकसभा निवडणुकीत उत्कृष्ट निवडणूक निर्णय अधिकारी पुरस्कारासाठी अकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांची निवड झाली आहे. लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनाही हा पुरस्कार जाहीर झाला आहे. राष्ट्रीय मतदारदिनी 25 तारखेला पुण्यात राज्यस्तरीय कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**संत निवृत्तीनाथ**
संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांची पौषवारी आजपासून श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर इथं त्यांच्या समाधीस्थळी सुरू होत असून, त्यासाठी नाशिक जिल्ह्यासह राज्यभरातून त्र्यंबकेश्वर इथ वारकऱ्यांच्या शेकडो दिंड्या दाखल होत आहेत. राज्यातील मान्यवर कीर्तनकारांची सेवाही इथं होणार आहे.

**अपघात**
जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक परधाडे स्थानकाजवळ काल संध्याकाळी झालेल्या रेल्वे अपघातातील मृत 12 प्रवाशांमध्ये 8 पुरुष, दहा वर्षांचं बालक आणि तीन महिलांचा समावेश आहे. जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयातील 0257-2217 193 या क्रमांकावर हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. मदत कार्य रात्री उशिरापर्यंत सुरू होतं. अपघातामुळं मुंबईकडून येणाऱ्या जाणाऱ्या सुमारे ८ गाड्या दीड ते दोन तास खोळंबल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त करत मृतांच्या वारसांना ५ लाख रुपये आर्थिक साहाय्य जाहीर केलं. राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्र्यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**सुवर्ण**

चंदीगडच्या पंजाब विद्यापीठात आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ महिला नेमबाजी स्पर्धेत मुंबई विद्यापीठाच्या मयुरी पवारनं 10 मीटर एअर रायफल महिला गटात सुवर्णपदक मिळवलं. मुंबई विद्यापीठाकडून विविध गटांमध्ये 19 खेळाडूंनी या स्पर्धेत भाग घेतला.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारतानं काल कोलकाता इथं झालेल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडचा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडच्या सर्वबाद 132 धावा झाल्या, भारतानं हे लक्ष्य तेराव्या षटकातच तीन गडी गमावून पूर्ण केलं. अभिषेक वर्मानं 34 चेंडूत 79 धावा करत सर्वाधिक वाटा उचलला, त्यानं केवळ 20 चेंडूत पन्नास धावा ठोकल्या. दुसरा सामना चेन्नई इथं शनिवारी होणार आहे.

**हवामान**

कोकण वगळता राज्यात सर्वत्र किमान तापमान 15 अंशांच्या खाली आहे. आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरच प्रादेशिक बातमीपत्र संपल ,नमस्कार**